# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

## अंत्योदय पुरस्कार - २०१४

## शुक्रवार, २५ एप्रिल, २०१४

## -: अहवाल :-

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने दिला जाणारा आणि मुंबईतील कै. डी. एच. गोखले आणि श्यामला गोखले न्यासाने पुरस्कृत केलेला **"अंत्योदय पुरस्कार"** (२०१४) प्रदान सोहळा **शुक्रवार,२५ एप्रिल, २०१४** रोजी योजण्यात आला होता.

समाजातील वंचित, उपेक्षित घटकांसाठी तळमळीने कार्य करणाऱ्या संस्थेला रु. १ लाख रोख आणि संस्थेच्या माध्यमातून या सर्व कामांची योजना बनवून त्यात समरसून योगदान देणाऱ्या व्यक्तिस सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सन २००० पासून या पुरस्कार प्रदान उपक्रमास प्रारंभ झाला. यंदा २०१४ साली **यवतमाळ जिल्ह्यातील दीनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ** आणि या संस्थेच्या माध्यमातून १९९७ पासून कार्यरत असणाऱ्या **प्रदीप वडनेरकर** यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य **प्रा. अनिरुध्द देशपांडे** होते तर कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे होते नामवंत **नेत्रशल्यविशारद डॉ. तात्याराव लहाने.**

पुरस्कारामागची भूमिका प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी मांडली तर प्रदीप वडनेरकर यांचा विस्तृत परिचय प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी करुन दिला.




श्री. प्रदीप वडनेरकर यांना अंत्यादय पुरस्कार देतांना डॉ. तात्याराव लहाने.

प्रमुख पाहुणे डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते प्रदीप वडनेरकर यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ प्रदान करण्यात आले तर गोखले न्यासाच्या चंदा गोखले यांनी संस्थेसाठी असलेला पुरस्कार निधी रु. १ लाख प्रदीप वडनेरकर यांना प्रदान केला.

सत्काराला उत्तर देताना वडनेरकर यांनी संस्थेची संपूर्ण वाटचाल व या वाटचालीत मिळत गेलेले यश यांची माहिती सर्वांसमोर ठेवली. उपेक्षित अशा पारधी समाजात आपल्या संस्थेच्या माध्यमातून होत असलेले प्रयत्न तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचे पुर्नवसन यात मिळत असलेले यश पाहून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढतो आहे. हे ही त्यांनी उपस्थितांना सांगितले.

प्रमुख पाहुणे तात्याराव लहाने यांनी आपल्या आयुष्यात ग्रामीण क्षेत्रातील गरजूंना दृष्टी मिळण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांचे स्वरुप व त्यामध्ये येणाऱ्या अडथळे उपस्थितांसमोर मांडले. समाजात वडनेरकर करत असलेल्या प्रयत्नांना पाहिले की अजून खूप वाव सामाजिक विकासकार्यात आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले.

प्रा. देशपांडे यांनी अध्यक्षीय समारोप करताना समाजातील विविध प्रकारच्या कामांची अवश्यकता किंबहुना ओळख अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून मिळते असे म्हटले. वडनेरकर व डॉ. लहानेंसारखी माणसे निर्मोही मनाने कार्य करत असताना त्याची दखल अंत्योदय पुरस्कार सोहळा आयोजकांकडून घेतली जातेय याचेही त्यांनी कौतुक केले.

चंदा गोखले याच्या आभार प्रदर्शनानंतर पसायदानाने या पुरस्कार सोहळ्याचा समारोप झाला.

*********